
# स्वाध्याय माला



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. ९५४०

BVBK-0401540

या पुस्तिकांसाठी उपयोगात आणलेले **संदर्भ-ग्रंथ**

**मध्ययुगीन चरित्रकोश**--ले. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव; **नवनीत**--ले. नारायण बाळकृष्ण गोडबोले; **आर्यांचे सण**— ले.' ऋग्वेदी'; **जिवंत व्रतोत्सव**— ले. काका कालेलकर; **संस्कृति समवाय** — ले. वत्सला भाटे. **स्वामी विवेकानंद**— ले. त्र्यं. ग. बापट; **सहा थोर पुरुष**-- ले. न. र. फाटक आणि अनेक लेखकांनी लिहिलेली चरित्रे.

'स्वाध्याय माला

**संपादक-मंडळ**

डॉ. ग. श्री. खैर, एम्. ए., पीएच्. डी.
श्री. दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्. ए.
श्री. मु. ल. जोशी, एम्. ईडी., बी. एस्सी.
श्री. उ. र. सेवलेकर, बी. ए. (ऑ.), एम्. ईडी.

**प्रकाशक : डॉ. गं. श्री. कोशे,**
अ. वि. गृह प्रकाशनाकरिता,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

**मुद्रक : दि. दा. गांगल,**
लोकसंग्रह मुद्रणालय,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

**आवृत्ती पहिली : १९५७**
**आवृत्ती दुसरी : १९६५**

© प्रकाशकाधीन

वाचनालय बा.वा. १५४०
१५।५।८३

स्वाध्यायमाला : पुष्प २०४ वे

प्रथम विभाग

## भारतीय सण व उत्सव

# आषाढ मास

म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बा. क्र. १५४०  १५।५।८३
विषय  क्र.

लेखिका
सौ. कुमुदिनी रांगणेकर,
मुंबई

★

BVBK-0401540

किंमत ७५ पैसे
किंमत [redacted]

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २.

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ती पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळात वर्षात येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळा त्यांतील काही उत्सव घरी साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासही मुले जात. त्यामुळे भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणीच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनी सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचे सध्याचे घटते प्रमाण इ. मुळे तशी स्थिती राहिलेली नाही. छोट्या-छोट्या पुस्तिकांच्या वाचनाने ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीने आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधी प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नावाजलेल्या लेखिकेने आत्मीयतेने सोप्या भाषेत थोडक्यात पुष्कळ माहिती दिली आहे. बालकांना व प्रौढ साक्षरांना ही पुस्तके आवडतील असा आम्हांस भरवसा आहे.

### १. मालेतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाही आवश्यक असे ज्ञान या पुस्तकांच्या वाचनाने मिळते.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालये, संघ, दल या संस्थांची वाचनालये व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठी.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगी देण्यासाठी; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगी पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचे स्वरूप :

* सुसंस्कृत नागरिकास असे वाटत असते की, आपल्या सभोवतालच्या वस्तू (विमान, रेडिओ, विजेची शक्ती इ.), राजकारणातील चालू प्रश्न; थोर पूर्वजांची चरित्रे, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास यांची माहिती आपणास असावी. मालेसाठी विषय निवडताना वरील दृष्टी ठेविली आहे.
* शाळेत स्थूलमानाने ज्या विषयांचे शिक्षण होते त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीही या पुस्तकांतून असते.

मनोरंजक पद्धतीने उपयुक्त विषयांचे ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणे हा मालेचा हेतू आहे.

दा. क्र. १५७० १४/५/८३



# आषाढ मास

ज्येष्ठ–आषाढ म्हणजे ग्रीष्म ऋतू असे मानतात; पण आषाढातच पुढला वर्षाऋतू सुरू होतो अन् पाऊस पडू लागतो.

कधी कधी तर आषाढ महिन्यात सारखा पाऊस पडतो. इथपासून पावसाळ्याचे चार महिने सुरू होतात ना? पण अती पाऊस पडला की, माणसांची प्रकृती बिघडते. कारण अशा पावसाळी दिवसात सूर्याचे दर्शनच होत नाही. अन् आपली प्रकृती चांगली राहाण्यासाठी अन्न, पाणी व हवा ह्यांबरोबर सूर्यप्रकाशही हवा असतो! त्याचप्रमाणे सारखा पाऊस लागला की, घराबाहेर पडता येत नाही. त्यामुळे मोकळी हवा मिळत नाही. पायी फिरण्याचा व्यायाम करता येत नाही. मग खाल्लेले अन्न नीट पचणार कसे? म्हणूनच ह्या चार महिन्यांत निरनिराळे उपास करितात. चार महि-

त्यांच्या ह्या मुदतीला चातुर्मास म्हणतात. आणि ह्या चातुर्मासात निरनिराळी व्रते करतात. कोणी चातुर्मासात रोज एक वेळ जेवून रहातात. कोणी कांदा खाणे सोडतात.

### कांदेनवमी

चातुर्मासाला आषाढ शुद्ध एकादशीपासून सुरुवात होते नि दोन दिवस आधी येणाऱ्या नवमीला **कांदेनवमी** म्हणतात मजेने. कारण पुढे चार महिने कांदा न खाणारी माणसे ह्या दिवशी कांदेच कांदे खातात. कांद्याची भजी, कांदेभात, आमटीत कांदा, कांदाबटाट्याची भाजी—वाळवंटातून प्रवास करताना पाणी मिळत नाही म्हणून उंट ह्या प्रवासाच्या आधी आपल्या पोटाच्या पिशव्यात ते साठवून घेतो—त्याप्रमाणे कांदेनवमीच्या दिवशी भरपूर कांदे खाऊन घ्यावयाचे !

ही झाली गंमत. पण कांदा चातुर्मासात सोडण्यात वेगळा हेतू असतो. कांदा वर्ज्य केला की, जेवण साधे बनवावे लागते. अन् पावसाळी दिवसात असे हलके जेवण चांगले. ते प्रकृतीला बाधत नाही. तेव्हा चातुर्मासात कांदा सोडला नाही तरी हलके जेवण जेवावे. तेलकट, तळकट जिन्नस जरा कमी खावे अन् उपास करावयाचा तो खराखुरा उपास करावा. नाहीतर 'एकादशी नि दुप्पट खाशी' असा प्रकार व्हावयाचा ! म्हणजे आजाराला नेमके आमंत्रण !

### जगन्नाथाची यात्रा

आषाढ महिन्याच्या शुद्ध द्वितीयेला जगन्नाथाची रथयात्रा निघते. ओरिसा प्रान्तातील जगन्नाथपुरीला हा यात्रेचा समारंभ होतो. या दिवशी कंसाला मारण्यासाठी कृष्ण व बलराम गोकुळाहून मथुरेला गेले होते. त्या गोष्टीची आठवण म्हणून रथातून

कृष्णाच्या व बलरामाच्या मूर्तींची मिरवणूक काढतात. त्यांची बहीण सुभद्रा हिची मूर्तीही रथात बसवितात. हा रथ भाविक लोक सुमारे दीड मैल दूर अंतरावर ओढून नेतात. नंतर दहा दिवसांनी रथ परत आणतात. त्याला **पुनर्यात्रा** किंवा **उत्तरयात्रा** म्हणतात.

## बेंदूराचा सण

कोकणामध्ये आषाढ शुद्ध त्रयोदशीच्या दिवशी गुरांची पूजा करितात. ह्याला **बेंदूर** असे म्हणतात. ह्या दिवशी गाईम्हशींना



व बैलांना आंघोळ घालतात. त्यांच्या शिंगांवरून शंखांच्या व फुलांच्या माळा घालतात. शिंगांना बेगड लावितात. कपाळाला कुंकवाचे टिळे लावतात. नि अशा सजविलेल्या गुरांना मग ओवाळतात. ह्या सणाच्या दिवशी गुरांना गोड खावयाला द्यावे म्हणून त्यांच्या आंबोणात गुळाचा खडा घालतात.

शेतकरी लोक गुरे पाळतात, आणि गुरांवर त्यांची फार माया असते. आपल्या बैलांच्या जिवावर शेतीची कामे होतात हे ते विसरत नाहीत. नि म्हणून बेंदूराचा सण ते मोठ्या उत्साहाने साजरा करतात. या दिवशी बैलांना कामाला लावीत नाहीत.

## गुरुपौर्णिमा

आषाढी **पौर्णिमेलाच गुरुपौर्णिमा** किंवा **व्यासपौर्णिमा** म्हणतात. व्यासमुनींनी महाभारत लिहिले. फार विद्वान् होते ते. आणि



फार मोठे गुरू–आचार्य–होते ते. अशा आचार्याला देवासारखे मानावे असे शास्त्रात सांगितले आहे. तेव्हा ह्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपल्या आजी व माजी गुरूंना भेटावे. आपल्याकडून होईल ते त्यांचे काम करावे. आजी गुरू म्हणजे सध्या शिकविणारे गुरू व माजी गुरू म्हणजे पूर्वी ज्यांनी शिकविले होते ते गुरू. प्राथमिक शाळेत शिकविणाऱ्या गुरुजींना कधी कधी इंग्रजी येत नसते. पण आपण पुढे इंग्रजी शिकलो तरी ह्या माजी गुरुजींबद्दल आदरच बाळगावा. आपल्या लेखी ते कायमचे पूज्य गुरुजीच आहेत. आपण जसजसे मोठे होतो, अधिक शिकतो तशी आपली गुरूंची यादी वाढणार. आणि गुरुपौर्णिमेच्या दिवशी ही यादी डोळयांसमोर आणली तर आपले दूर गेलेले बालपण जवळ येईल. बिगारीतले किंवा बालवर्गातले गुरुजी, नंतर कच्च्या पहिलीचे, पक्क्या पहिलीचे गुरुजी अशा अनेक गुरुजींची आठवण

काढताना आनंद वाटतो आणि त्यामुळे गुरुजींबद्दलची आपुलकी व आदर दाखविण्याची संधीही मिळते.

निरनिराळे गुरुजी निरनिराळे विषय शिकवितात आणि प्रत्येकाची शिकविण्याची पद्धतीही वेगवेगळी असते. तेव्हा अशा रीतीने ओळीने सर्व गुरुजींची आठवण काढली तर त्यात आपला मोठाच फायदा होतो. प्रत्येकाने दिलेल्या ज्ञानाचा आढावा घेताना कधी कधी काही विसरलेले ज्ञान आपल्याला आठवते, हरवलेले सापडल्याचा आनंद होतो नि त्या विसरलेल्या ज्ञानाला उजाळा मिळतो. तेव्हा ही गुरुपौर्णिमा अशी साजरी केल्याने आपला स्वार्थ व परमार्थ दोन्ही साधतात.

## आषाढी एकादशी

आता आषाढ शुद्ध एकादशीची माहिती पाहू या. प्रत्येक महिन्याच्या शुक्ल व कृष्ण पक्षातील अकराव्या तिथीला एकादशी म्हणतात; पण आषाढी एकादशीला महाएकादशी असे नाव आहे. या दिवशी पंढरपूरला विठोबाची मोठी यात्रा भरते. काही



माणसे वर्षातील सर्व एकादश्यांच्या दिवशी उपास करतात ; पण असे उपास न करणारी माणसे बहुधा महाएकादशीचा उपास मात्र करतातच. ह्या महाएकादशीला **शयनी एकादशी** म्हणतात.

ह्या दिवशी भगवान विष्णू शयन करतो–झोपी जातो–असे समजतात. ह्या दिवसापासूनच चातुर्मासाचा आरंभ होतो. पुढे चार महिन्यांनी येणाऱ्या कार्तिक शुद्ध एकादशीला **प्रबोधिनी एकादशी** म्हणतात. ह्या दिवशी विष्णू जागा होतो.

पुराणामध्ये एकादशीची कथा अशी सांगितली आहे :— प्राचीन काळी मृदुमान्य ह्या नावाचा एक राक्षस होता. त्याने पुष्कळ तप केले व शंकराला प्रसन्न करून घेतले. शंकराकडून त्याने अमरत्वाचा वर मागून घेतला– म्हणजे आपल्याला मरण येऊ नये असा आशीर्वाद त्याने मागितला. ‘एका स्त्रीशिवाय तुला दुसऱ्या कोणाच्याही हातून मृत्यू येणार नाही’ असा श्रीशंकराने त्याला वर दिला.

ह्यामुळे मृदुमान्य फार शेफारला. देवांना तो भारी त्रास देऊ लागला. त्या काळी देव आणि दानव—म्हणजे राक्षस ह्यांच्यामध्ये नेहमी लढाया होत. त्यात देव नेहमी जिंकत. पण मृदुमान्याला हा वर मिळताच हे बदलले. त्याने देवांना मारण्याचा सपाटा सुरू केला.

ब्रह्मा, विष्णू आणि महेश ऊर्फ शंकर हे तीन मुख्य देव मानले जातात. ह्यांतील ब्रह्मा हा सृष्टी उत्पन्न करणारा, विष्णू हा तिचे पालन करणारा व शंकर हा संहार करणारा असे समजतात. तेव्हा विष्णूवर पालन करण्याची–संभाळण्याची–जबाबदारी होती. आणि म्हणून तो शंकराजवळ गेला अन् मृदुमान्याचा नाश कसा करता येईल, ह्याचा विचार करू लागला; पण शंकरालाही उपाय सुचेना. शेवटी मृदुमान्याच्या भीतीने ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे तिघेही एका गुहेत दडून राहिले. मृदुमान्य मोठा वस्ताद होता नि त्यात त्याला ह्या वराचे पाठबळ होते.

त्याने ह्या त्रिमूर्तींचा--तीन देवांचा--शोध लावला. तो आला नि त्या गुहेच्या दाराशी उभा राहिला. त्यामुळें त्रिमूर्तींना गुहेच्या बाहेर पडता येईना. तीन दिवस त्यांना त्या गुहेत उपास घडला. आणि त्यांच्या कोंडलेल्या, एकवटलेल्या श्वासापासून एक देवता उत्पन्न झाली. ती एकादशी देवता. शंकराने मृदुमान्याला वर दिला होता त्यात 'एका स्त्रीशिवाय' असे म्हटले होते. आणि ह्या स्त्रीकडून—एकादशीकडून—मृदुमान्य मरण पावला आणि देव दानवांच्या जुलुमातून सुटले. तेव्हापासून एकादशीच्या दिवशी उपास व ईश्वराचे भजन-कीर्तन करण्याची रीत पडली. त्यामुळे माणसाची दुःखातून, संकटातून सुटका होते असा समज आहे.

ह्या महाएकादशीला पताका घेऊन टाळ-मृदंगांच्या गजरात पांडुरंगाला त्याचे भक्त आळवितात नि त्याला भेटायला



पंढरपुराला जातात. ह्याला **पंढरीची वारी** म्हणतात. ह्या दिवशी पंढरपुरात भक्तांची रीघ लागते आणि आळंदीहून ज्ञानेश्वराची, देहूहून तुकारामाची, पैठणहून एकनाथाची, त्र्यंबकहून निवृत्ति-

नाथाची, एदलाबादहून मुक्ताबाईची, मच्छेंद्रगडाहून मच्छेन्द्रनाथाची, सासवडहून सोपानदेवाची व आरणगावाहून सावता माळ्याची अशा संतांच्या आणि देवाच्या भक्तांच्या पालख्या पंढरपुराला येतात.

पंढरपुराला महाएकादशीच्या दिवशी थोडेच लोक जाऊ शकतात. बाकीचे गावातील विठोबाच्या देवळात जातात. उपास करतात. रात्री भजन-कीर्तन ऐकतात व दुसऱ्या दिवशी उपास सोडतात. हा आणि असले इतर उपास शक्य तेवढे कडक करावे. शक्य तेवढे कमी खावे त्या दिवशी. ह्याला लंघन म्हणतात. आणि प्रकृती नीट रहाण्यासाठी असे लंघन आवश्यक असते. विशेषत: पावसाळ्यात आपली पचनशक्ती जरा मंद होते. तेव्हा पावसाळ्याच्या चार महिन्यांत येणारे उपास प्रकृती चांगली रहावी म्हणून करावयाचे असतात. आपण एकादशी नि दुप्पट खाशी केली तर पोट बिघडते. मग बिचारा कंटाळलेला पोटोबा आपल्याला पत्र पाठवितो आणि तक्रार करतो. तेव्हा अशी वेळ येऊ नये म्हणून खराखुरा उपास करावा. लहानपणापासून उपासाची सवय असणे चांगले. त्यामुळे जिभेवर ताबा ठेवण्याचे शिक्षण मिळते. शरीराला शिस्त लागते.

हातचा राखून खर्च करणे शहाणपणाचे असते. त्याप्रमाणे पावसाळ्यात नि आषाढात चार घास भूक ठेवून जेवणे शहाणपणाचे; म्हणजे डॉक्टरांच्या दवाखान्याची पायरी चढण्याचे कारणच पडणार नाही व आजारीपणाचा त्रासही वाचेल.

**संत नामदेवाची पुण्यतिथी**

अशा ह्या आषाढ महिन्याच्या वद्य त्रयोदशीला संत नामदेवाची पुण्यतिथी येते. सध्यांच्या मुंबई प्रांतात असलेला मराठ-

वाडा हा पूर्वी मोंगलाईत म्हणजे निजामच्या राज्यात होता. तिथल्या परभणी जिल्ह्यातील एका गावी दामाशेटी नावाचा एक शिंपी जातीचा गृहस्थ रहात असे. नामदेव हा त्याचा मुलगा. दामाशेटी विठोबाचे भक्त होते. त्यांचे घराणेच विठ्ठलभक्त होते.

नामदेव पाच वर्षांचा असताना दामाशेटी एकदा काही कामासाठी परगावी गेले. तेव्हा गोणाईने—नामदेवाच्या आईने—त्याच्या हाती नैवेद्याच्या दुधाची वाटी दिली. आणि देवाला नैवेद्य दाखविण्यासाठी नामदेव देवळात गेला.

वाटीतले दूध देव पिणार ही नामदेवाची कल्पना. त्याने देवाला दूध पिण्याचा पुष्कळ आग्रहही केला. पण दगडाची



देवाची मूर्ती दूध कसे पिणार? देव दूध पीत नाही, म्हणून लहानग्या नामदेवाला फार वाईट वाटले आणि तो म्हणाला, " देवा, तू जर हे दूध प्याला नाहीस तर मी तुझ्या पायांवर डोके आपटून जीव देईन ! "

त्या छोट्या भक्ताची ही धमकी ऐकून देव घाबरला आणि देवाच्या त्या दगडी मूर्तीने ते दूध पिऊन टाकले. मग नामदेवाचे समाधान झाले. दुधाची रिकामी वाटी नामदेवाने घरी आणली.

गोणाईने नवलाने विचारले--" बाळ, नैवेद्याचे दूध कुठे आहे ? " " देव दूध प्याला " नामदेवाने आनंदाने बातमी दिली. देव दूध प्याला ! छेः ! गोणाईला हे कसे पटणार ? ती म्हणाली, " अरे वेडया ! दगडाचा देव कधी दूध पितो का ? ते तूच प्याला असशील ! आणि देवाचे नाव पुढे करीत असशील." पण नामदेवाचे उत्तर कायम होते, " देव दूध प्याला."

तेव्हा दुसऱ्या दिवशी नैवेद्याचे दूध घेऊन तिने नामदेवाला देवळात पाठविले आणि दामाशेटी हळूच त्याच्या मागून गेले. अन् काय चमत्कार ! आदल्या दिवसाप्रमाणे खरोखरच देव दूध प्याला ! दामाशेटीने ओळखले की, आपला मुलगा देवाचा मोठा भक्त होणार !

आणि तसा तो झाला. पण हे मोठेपण मिळवावयाला त्याला किती श्रम करावे लागले ! तुकारामाने म्हटले आहे की, " ज्याचे अंगी मोठेपण, तया यातना कठिण ! " अगदी खरे आहे हे ! नामदेवाला अशाच यातना सोसाव्या लागल्या.

तो देवाचा भक्त झाला खरा; पण त्याला ज्ञान नव्हते आणि ज्ञान हे गुरूशिवाय कधीच मिळत नसते. गुरू हाच खरा ज्ञानदाता--ज्ञान देणारा ! गुरूवाचून विद्या नाही ! म्हणूनच गुरुपौर्णिमेला आपल्या गुरुजींची आठवण करावयाची असते.

नामदेवाने अजून गुरूकडून ज्ञान घेतले नव्हते. एकदा ज्ञानेश्वर वगैरे संतांनी तो अजून कच्चा आहे म्हणून त्याची मस्करी केली. त्यामुळे नामदेव चिडला आणि त्याने सरळ आपल्या आवडत्या विठोबाला त्याची तक्रार सांगितली. तेव्हा देवाने त्याची समजूत घातली व " नागनाथाच्या देवळात विसोबा खेचर म्हणून एक माणूस आहे त्याला गुरू कर," असे सांगितले.

तेव्हा नामदेव मुकाट्यानं नागनाथाच्या देवळात गेला नि पहातो तर तेलाने लडबडलेल्या नव्या वहाणा पायात घातलेला एक म्हातारा शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून गाभाऱ्यात पसरलेला ! तो म्हातारा रोगटही होता नि नामदेवाला तो आचरटही वाटला. अन् हा आपला गुरू !

नामदेव त्याला म्हणाला—" अहो ! अहो ! नीट उठून बसा, पहा तरी जरा तुमचे पाय चक्क पिंडीवर पडले आहेत ! " तेव्हा विसोबा बोलले " बाबारे ! म्हातारा झालो आहे मी. माझ्या अंगात शक्ती नाही. जरा तूच माझे पाय उचल आणि देव नाही अशा जागी ठेव ना ! मग नामदेवाने विसोबाचे पाय उचलले आणि बाजूला ठेवले. पण हे काय ? विसोबाच्या



पायांखाली दुसरी पिंडी तयार ! तिथून पुनः उचलले तर तिसरी पिंडी तयार ! नामदेवाने सगळ्या देऊळभर विसोबाचे पाय नाचविले. पण जिथे पिंडी नाही असे पाहून पाय ठेवावे तिथे पायाखाली नवी पिंडी तयार !

आता मात्र नामदेवाला ह्या चमत्काराचा अर्थ कळला ! त्याच्या गुरुजींनी त्याला पहिलाच धडा मोठा छान दिला की, जगात सर्व ठिकाणी देव आहे ! अगदी खरा नि तितकाच महत्त्वाचा धडा आहे हा ! मनावर तो बिंबला म्हणजे आपण सगळी देवाची लेकरे आहोत, सगळी सारखी आहोत हे आपल्याला पटेल ! आणि आपल्या अंगात माणुसकी येईल ! आपण माणूस तर असतोच; पण सर्वांच्याच अंगी माणुसकी असते असे नाही ! माणुसकी हा मोठा गुण आहे. सर्व लोकांशी प्रेमाने वागावयाला तो शिकवितो. ही माणुसकी ज्यांच्या अंगात अधिक असते ते संत होतात.

नामदेव संत होते. कारण त्यांच्या अंगात माणुसकी होती. त्यांनी विसोबा खेचरांना आपले गुरू केले. त्यांचा उपदेश घेतला. ज्ञान मिळविले आणि ते पंढरपुराला परत आले. एके दिवशी विठोबाला वाटले की, गुरूचा उपदेश नामदेवाला किती पटला आहे ते पहावे. म्हणून नामदेव जेवत बसले असता विठोबा कुत्र्याचे रूप घेऊन तिथे आले नि त्यांनी झडप घालून नामदेवाच्या ताटातील भाकरी पळविली. पण त्यामुळे नामदेवाला मुळीच राग आला नाही. तर उलट कुत्र्याने कोरडी भाकरी खाऊ नये म्हणून तुपाची वाटी घेऊन ते पाठीमागून धावले! तेव्हा विठोबाची खात्री झाली की, नामदेवाने खरे ज्ञान मिळविले आहे. जगातील मनुष्यांप्रमाणे सर्व प्राण्यांमध्येसुद्धा देवाचा अंश असतो हे त्याला पटले आहे. म्हणजेच नामदेवाच्या अंगी माणुसकी भरपूर आहे !

नामदेवाने पुष्कळ अभंग लिहिले. त्यांत विठ्ठलाबद्दल खूप जिव्हाळा दिसून येतो. उदाहरणार्थ, नामदेव विठोबाला म्हणतात.

तू माझी माऊली । मी वो तुझा तान्हा ।
पाजी प्रेम पान्हा । पांडुरंगे ।। १ ।।
तू माझी माऊली । मी तुझे वासरू ।
नको पान्हा चोरू । पांडुरंगे ।। २ ।।

नामदेवाची आई गोणाई व बायको राजाई ह्यांनीही छान अभंग केले. त्याचप्रमाणे नामदेवाचे मुलगे नारा, महादा व गोंदा ह्यांनीही अभंग रचले होते. एवढेच नव्हे तर, नामदेवाच्या घरची मोलकरीण जनी हिनेही फार प्रेमळ अभंग रचले.

घरातील वातावरणाचा मुलांबाळांवर व नोकरमाणसांवर-सुद्धा असा चांगला परिणाम होत असतो !

### संत जनाबाई--पुण्यतिथी

ह्या जनीची—जनाबाईची—पुण्यतिथीसुद्धा आषाढ वद्य त्रयोदशीलाच येते. नामदेवाच्या घरी दळणकांडण करताना जनाबाईने अभंग जुळविले. तिची विठोबावर एवढी भक्ती होती की, कधी कधी तो तिला दळावयाला मदत करी



असाच एकदा देव मध्यरात्री तिला दळू लागला होता. दळताना श्रम हलके व्हावे, म्हणून जनीबरोबर तो गाणीही गात

होता. म्हणूनच भक्तांनी विठ्ठलाला 'विठोबामाउली' म्हटले आहे. माउलीप्रमाणे—आईप्रमाणे—तो भक्तांचे लाड पुरवितो.

अशा रीतीने जनाबाई आणि तिची आवडती 'विठाबाई' दळत होती. जनाबाई विठोबाला 'विठाबाई' म्हणत असे:–

**'ये ग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई ।'**

हा जनाबाईचा प्रसिद्ध अभंग आहे.

दळण्याच्या नि गाण्याच्या नादात पहाट केव्हा झाली ते देवाला कळलेच नाही ! अन् एकदम प्रकाशाचा पहिला किरण दिसला. देवळात पहाटेच्या काकड-आरतीची वेळ झाली ! पुजारी पूजेसाठी आत जातील आणि गाभाऱ्यात देव नाही !—

विठोबा भ्याले आणि घाईघाईने देवळात धावले. पण त्या धांदलीत अंगावरील शेला आणि गळ्यातील वैजयंती माळेमधले पदक चुकून जात्याच्या बाजूलाच पडले. पुजाऱ्यांनी शोधाची धामधूम सुरू केली; आणि ह्या वस्तू जनीच्या जवळ सापडल्या. तिच्यावर चोरीचा आरोप ठेवण्यात आला; आणि बिचारीला सुळी देण्याची शिक्षा दिली गेली.

तिला मोठा आधार काय तो विठोबाचा ! त्याचा धावा केला तिने. त्यासरशी सुळाचे पाणी झाले ! देवाची तिच्यावर एवढी माया होती तरी तिने त्याबद्दल गर्व बाळगिला नाही ! ती अगदी साधेपणाने वागे आणि प्रत्येक अभंगाच्या शेवटी तिने 'नामयाची जनी' किंवा 'नामयाची दासी' असे स्वतःला म्हटले आहे, म्हणजे आपली मूळ स्थिती ती विसरली नाही. म्हणून ती खरी मोठी होती ! कधी कधी असे होऊ शकते की, आपल्या वडील माणसापेक्षा आपल्याला अधिक शिक्षण मिळते, अर्थातच वडील माणसांनी त्यासाठी झीज सोसलेली असते. त्यांच्यामुळे आपल्याला

मोठे होण्याची संधी मिळालेली असते ! आणि हे न विसरण्यातच आपला खरा मोठेपणा आहे! दुसऱ्यांना मोठेपणा दिला तर त्यात आपल्याकडे कमीपणा येत नसतो ! जनीने हे लक्षात ठेवले. नामदेवाच्या घरी ती मोलकरीण होती हे तिला लाजिरवाणे वाटले नाही ! आपण नामयाची दासी होतो हे तिने पुनः पुनः सांगितले. जे स्वतः मोठे असतात तेच दुसऱ्यांच्या मोठेपणाचे कौतुक करितात. जनाबाईचा हा अभंग पहा :—

**नोवरीया संगे वऱ्हाडिया सोहळा । मांडे पुरणपोळचा मिळे अन्न ।।१।।**
**परिसाचेनि संगे लोहो होय सोने । तयाची भूषणे श्रीमंतांसी ।।२।।**
**जनी म्हणे जोड झाली विठोबाची । दासी नामयाची म्हणोनियां ।।३।।**

ह्या अभंगात जनाबाई म्हणते की, नवरीमुळे वऱ्हाडी मंडळींना पक्वान्ने खावयाला मिळतात. लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला म्हणजे त्याचे सोने होते आणि श्रीमंतांना दागिने बनविता येतात. त्याचप्रमाणे मी नामदेवाच्या घरी दासी होते म्हणूनच मला विठोबाची संगत लाभली !

अन् शेवटपर्यंत कृतज्ञ असलेली ही जनाबाई नामदेवा-बरोबरच मरण पावली. नामदेवाची बायकोसुद्धा त्याच वेळी मृत्यू पावली. आषाढ वद्य त्रयोदशीच्या दिवशी नामदेवाने आणि जना-बाईने समाधी घेतली. संतांच्या मृत्यूला समाधी घेणे म्हणतात.

## संत सांवता महाराजांची पुण्यतिथी

अशाच आणखी एका संताची पुण्यतिथी आषाढ वद्य चतुर्दशीला येते. ह्या संताचे नाव सावता माळी ! जातीने माळी होता तो. भाजीपाला लावण्याचा धंदा होता त्याचा आणि गंमत अशी की, त्याच्या अभंगांतून भाजीपाल्याचीच नावे आहेत आणि

त्या भाज्यांमध्ये त्याला विठोबा दिसत असे. एका अभंगात तो म्हणतो—

**कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी ।।१।।**
**लसूण मिरच्या कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरी ।।**

जुन्या लोकांना आषाढ महिन्यातील एकादशीपासून कांदा लसूण वर्ज्य असते! पण सावता माळ्याची पुण्यतिथी ह्याच महिन्यात असते ना. त्यामुळे त्याच्या अभंगातील कांदा, लसूण आषाढातच तोंडात आली आता! पण ती संताच्या अभंगातली आहे. तेव्हा सोवळीच असणार ती! नाही का?

आता सावता माळ्याची माहिती पाहू या. विठोबा जसा जनाबाईला दळू लागे त्याप्रमाणे तो सावता माळ्याच्या मळ्यात खपे. त्याची भाजी विकीत असे विठोबा. देवाचा नि भक्ताचा असा जिव्हाळा होता. एकदा विठोबाने त्याची परीक्षा पहाण्याचे ठरविले.

पंढरपुरापासून काही अंतरावर अरणभेंडी म्हणून गाव आहे. तिथे सावता माळी रहात असे. एकदा ज्ञानदेव व नामदेव ह्यांच्याबरोबर विठोबा कूर्मदास नावाच्या भक्ताकडे चालले होते. वाटेत अरणभेंडी गाव लागले. तेव्हा "तुम्ही दोघे इथेच थांबा. मी सावत्याला भेटून येतो" असे सांगून विठोबा सावत्याकडे गेले.

सावता माळी मळ्यात काम करीत होता. विठोबा त्याला म्हणाला, "सावत्या, मला आधी लपव कोठे तरी. दोन चोर माझ्या मागे लागलेत बघ; चल आटोप."

सावत्याच्या हातात खुरपे होतेच. त्याने पटकन खुरप्याने आपले पोट चिरले. विठोबाने लगेच अगदी लहान सूक्ष्म रूप घेतले. सावत्याने मग त्या सूक्ष्म देवमूर्तीला आपल्या पोटात घातले आणि वरून उपरणे गुंडाळले.

इकडे देव अजुनी कसा येत नाही अशी काळजी नामदेवाला पडली व तो आणि ज्ञानेश्वर शोध करीत मळ्याकडे आले. सावता माळी त्यांच्या नजरेला पडला. ईश्वराचे भजन करण्यात स्वारी तल्लीन झाली होती !

संताची खूण संताला पटली ! प्रत्यक्ष पांडुरंग ह्याच्यापाशी असणार, म्हणूनच हा इतका रंगला आहे, हे नामदेवाने ओळखले व देवाची आणि आमची भेट कर, अशी त्याने सावत्याला विनंती केली.

सावत्याने लगेच विठोबाला बाहेर काढले. देवसुद्धा विनोदी होते, त्यांनी मुद्दामच ही गंमत केली होती. त्यामुळे सावत्याची त्यांच्यावरील भक्ती कळून आली आणि नामदेव व ज्ञानेश्वर ह्यांना आपणच देवाचे भक्त आहोत असा गर्व झाला असला तर तो कमी होईल ! कारण सावता माळी विठोबाचा भक्त होता तरी तो एकदासुद्धा पंढरपुराला गेला नव्हता !

संसार सोडून देवाची भक्ती करणे त्याला पसंत नव्हते. आपली कर्तव्ये नीट पार पाडावयाची आणि देवाचे भजन, पूजन करावयाचे. सावत्याची ही पद्धत फार छान आहे. आणि आपण प्रत्येक बाबतीत ती पाळली तर त्याहून छान होईल ! आई वडिलांची लहानसान कामे करावयाची. नंतर अभ्यास करावयाचा. अभ्यास आटोपला म्हणजे खेळावयाचे. अशा रीतीने महत्त्वाचे कर्तव्य आधी व इतर कर्तव्ये त्यामागून, अशी सवय आपण आपल्याला लावावी; म्हणजे सावता माळ्याच्या चरित्रापासून योग्य धडा शिकल्यासारखे होईल.

नामदेव, जनाबाई व सावता माळी हे झाले जुने संत ! त्यांना प्राचीन संत म्हणतात. आता एका अर्वाचीन म्हणजे नव्या

संताची कथा पाहू या. हा अर्वाचीन–अलीकडील काळातील–संत म्हणजे लोकमान्य टिळक !

**लोकमान्य टिळक-जयंती**

लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी ऑगस्ट महिन्याच्या एक तारखेला साजरी करितात ! कारण इंग्रजी कालगणनेप्रमाणे त्या तारखेला ते मृत्यू पावले. पण त्यांची जयंती ही तिथीप्रमाणे, मराठी कालगणनेप्रमाणे आषाढातील वद्य षष्ठीला येते. आणि म्हणूनच ह्या महिन्यात आपण ती धरू या.

लोकमान्य टिळकांनी फार मोठी कामगिरी केली. १९४७च्या ऑगस्टच्या १५ तारखेला आपला भारत देश स्वतंत्र झाला ! पण ह्या स्वातंत्र्याच्या चळवळीला सुरुवात त्यापूर्वी ३०।३५वर्षे टिळकांनी केली होती. टिळकांनी स्वातंत्र्याच्या मंदिराचा पाया घातला होता. नंतर इतर देशसेवकांनी कष्ट केले व वरती हळूहळू मंदिर बांधले. आणि महात्मा गांधींनी १९४७ च्या १५ ऑगस्टला ह्या मंदिरावर कळस बसविला व ते पूर्ण केले ! पण पाया मजबूत होता म्हणून मंदिराची इमारत नीट बांधली गेली ! तेव्हा हा पाया उत्तम घालण्याचे श्रेय टिळकांकडे जाते !



लो. टिळक

‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे’ असे टिळक म्हणत. आणि त्यांनीच ही भावना लोकांच्या हृदयात रुजविली. आपल्या देशावर टिळकांची मोठी भक्ती होती ! ब्रिटिश सरकारचा त्याचमुळे त्यांच्यावर फार राग होता. कारण टिळक जे

तोंडाने बोलत तेच आचरणात आणीत असत. ह्याकारणाने पुष्कळ तरुण त्यांचे शिष्य झाले होते.

टिळकांची ही वाढती लोकप्रियता सरकारला आवडेना. सरकारने काही तरी निमित्त काढून टिळकांना तुरुंगात घातले. टिळक लोकांच्या नजरेआड झाले की, लोकांना त्यांचा विसर पडेल अशी सरकारची कल्पना! पण ती कल्पना चुकीची ठरली! टिळकांबद्दल लोकांना फारच आदर वाटत होता. आणि शिवाय 'केसरी' व 'मराठा' ही त्यांनी सुरू केलेली वृत्तपत्रे चालू होती. त्यामुळे टिळक दृष्टिआड झाले तरी लोकांच्या प्रेमादराला मुकले नाहीत. उलट ते निरपराधी असताना शिक्षा भोगीत आहेत, हे कळल्यामुळे लोकांना त्यांच्याबद्दल अधिकच आदर वाटू लागला.

'केसरी'च्या अंकांमधून टिळकांचे विचार लोकांना समजत होतेच. शिवाय तुरुंगात असताना टिळकांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. टिळकांनी हे एकच पुस्तक लिहिले असते तरी त्यामुळे त्यांची कीर्ती चहूकडे पसरली असती. कारण हे पुस्तक आहेच त्या योग्यतेचे! यश हे नेहमी संख्येपेक्षा गुणांवरच अवलंबून असते.

टिळक विलायतेची वारी करून आले होते. पण आपल्या देशात त्यांनी शक्य तो सूट, बूट घातला नाही. कारण माय-भूमीच्या प्रेमाप्रमाणे त्यांना आपल्या पोषाखाचेही प्रेम होते. इंग्रज हिंदुस्थानात असताना कधी धोतर नेसत होते का? मग त्यांना जसा त्यांच्या पोषाखाचा अभिमान आहे तसा आपणाला आपल्या देशी पोषाखाचा अभिमान का असू नये?

आपल्या ह्या जुन्या पद्धती आपण राखून ठेवावयाला हव्यात! आपल्या सणांच्या दिवशी मुद्दाम जुने पोषाख घालावे. ते कधी न वापरल्यामुळे त्यांची आपल्याला अपूर्वाई

वाटेल ! ते जुनेही नवे वाटेल ! आणि आपल्या देशाची परंपरा राखली हा आनंद मिळेल ! प्रत्येक देशातील पोषाखाची व रीतिरिवाजाची तऱ्हा वेगवेगळी असते ! आणि आपापली तऱ्हा वेगळी राखणे ह्याला परंपरा म्हणतात ! आणि अशी परंपरा राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे ! त्यामुळेच आपली देशभक्ती दिसून येते. टिळकांनी म्हणूनच आपला पोषाख जुना ठेवला. आपली परंपरा राखली !

स्वराज्य मिळविण्यासाठी टिळकांनी मूळ प्रयत्न केले ह्याचा आपल्याला विसर पडता कामा नये ! तो पडू नये अशी ईश्वराचीही इच्छा दिसते. कारण इंग्रजी कालगणनेप्रमाणे ज्या ऑगस्ट महिन्यात आपल्याला स्वराज्य मिळाले त्याच महिन्याच्या पहिल्या तारखेला चहूकडे टिळक पुण्यतिथी साजरी होते !

आधी टिळक पुण्यतिथी नि मग स्वातंत्र्यदिनाचा सोहळा ! म्हणजे ज्याने ह्या स्वातंत्र्याचा प्रारंभ केला त्या थोर संताची आठवण आधी आणि त्याच्या कार्याचा जो उत्तम शेवट झाला त्याची आठवण नंतर ! —आधी पाया मग कळस ! —

**आगरकर जयंती**

ह्या आषाढ महिन्यात एका थोर समाजसुधारकाची जयंती साजरी करावयाची आहे. त्या व्यक्तीचे नाव गोपाळ गणेश आगरकर. १९५६ साली त्यांची जन्मशताब्दी महाराष्ट्राने साजरी केली. त्यांचा व लोकमान्य टिळकांचा जन्म एकाच वर्षी एकाच महिन्यात–आषाढात–झाला होता. आणि दोघांच्याही जन्माला १९५६ साली शंभर वर्षे पुरी झाली.

टिळक राजकारणात पडले. आगरकरांनी सामाजिक सुधारणा हाती घेतली. भारी कठिण काम होते हे ! आगरकरांनी पुण्या-

तील जुन्या लोकांचा स्वत:वर मोठा राग ओढवून घेतला. पण त्यांनी त्याची पर्वा केली नाही. मुलींचे लहान वयात विवाह करणे, मुलींना शिक्षण न देणे इत्यादी गैर गोष्टी बदलण्याचा त्यांनी निश्चय केला.



प्रि. आगरकर

त्यांनी 'सुधारक' ह्या नावाचे साप्ताहिक काढले. आणि ते त्याच्या द्वारे समाजाच्या अंधश्रद्धेवर टीका करू लागले. आपल्या जीवनात श्रद्धा हवीच. पण ती डोळस असावी. म्हणजे जुन्या रूढीतील चांगले तेवढेच उचलता येईल. आगरकरांचे हे म्हणणे योग्य होते. पण त्यांचे विचार म्हणजे निव्वळ गरुडाची झेप! एकदम समाजाची सर्व बाजूंनी सुधारणा करू इच्छित होते ते. पण ते कसे जमावे? समाज ही केवढी जुनी संस्था आहे. तिच्यात इतका मोठा बदल असा चटकन कसा होईल? शिवाय पाण्यात राहून माशाशी वैर धरणे ठीक नव्हे!

आगरकरांचे विचार उत्तम होते. पण ते फार भराभर त्यांचा उच्चार करीत आणि आचारात आणू पहात. त्यामुळे पुण्यातील लोक त्यांच्यावर फार चिडले. आणि त्यांनी आगरकरांची जिवंतपणी स्मशानयात्रासुद्धा काढली. अर्थातच तरीही आगरकरांनी आपली मते ठाम ठेवली. त्याच वेळी त्यांच्या हयातीत त्यांची मते समाजाला पटली नाहीत हे खरे! पण त्यानंतर हळूहळू समाजाला ती समजली अन् पटली!

सुमारे साठ वर्षांपूर्वी त्यांनी सुचविलेल्या कांही सुधारणा समाजाला आज पटत आहेत. तेव्हा त्यांना महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणणे योग्य होईल !

समाजसेवेचे हे अत्यंत कठिण व्रत आगरकरांनी १५ वर्षे चालविले. आणि वयाच्या ३९ व्या वर्षी ते वारले.

**चार्तुमासांतील व्रते**

दिवसेंदिवस जुनी व्रते मागे पडत आहेत. ही व्रते विशेषेकरून स्त्रिया करीत असत. वातींचा लक्ष लावणे, तुळशीला किंवा कोणत्या तरी देवाला एक लाख प्रदक्षिणा घालणे, एकवेळ जेवणे अशा तऱ्हेची ती व्रतें असत. आजकाल पूर्वीप्रमाणे देवापुढे रोज समईच पेटवीत नाहीत. मग चातुर्मासात एक लक्ष वाती करणार कशाला ?

पण ह्या व्रतांच्या मागे असलेला हेतू लक्षात आणावयास पाहिजे ! अमुक दिवसात अमुक गोष्ट पुरी करण्याची शिस्त आपल्याला लागावी हा हेतू आहे त्यात. अशा शिस्तीमुळे मग वर्षभर व्यवस्थित वागण्याची सवय लागते. तेव्हा जुन्यामधले हे चांगले अवश्य उचलावे. आणि आपल्या नेहमीच्या आयुष्याला मदत करील असे व्रत आपण चातुर्मासात करावे.

रोज अमुक वेळ घरात राहून आपल्या माणसांची कामे करावयाची, त्यांच्याशी गप्पा मारावयाच्या असा नियम करावा. आणि मित्र गोट्या खेळायला, पतंग उडवायला बोलावू लागले तरी जावयाचे नाही अशी शिस्त मनाला लावावी.

मैत्रिणी दोरीवरच्या उड्या मारण्याचा आग्रह करू लागल्या, कट्टी करण्याचे भय त्यांनी दाखविले तरी आपले व्रत मोडू नये. मैत्रिणींना हे समजून सांगावे. म्हणजे त्याही असेच व्रत धरतील

आपण चांगले वागावे आणि दुसऱ्यांना चांगले वागावयास शिकवावे. संत रामदासांनी म्हटले आहे की—

**जे जे आपणांसी ठावे । ते ते दुसऱ्यासी शिकवावे ।।**
**शहाणे करोनि सोडावे । सकळ जन ।।**

जे आपल्याला येते ते दुसऱ्यांना अवश्य शिकवावे. मात्र आपल्याला येणारी चांगली व उपयोगी गोष्टच दुसऱ्याला शिकवावयाची बरं! कारण दुसरे त्यामुळे शहाणे व्हावयास हवेत!

तेव्हा प्रत्येकाने चातुर्मासात उपयोगी असे व्रत धरावे. नियमित व्यायाम करण्याचे व्रत धरावे म्हणजे अनायासे वर्षभर व्यायाम करण्याची सवय जडेल! तुम्हांला चहाची फारच चटक असेल तर ती कमी करण्याचे व्रत चातुर्मासात सुरू करा. प्रकृतीला अपायकारक असणारा चहा सुटेल नि जिभेवर ताबा ठेवण्याची सवय लागेल!

ज्या सवयीमुळे आपले नुकसान होते पण ज्या सोडवत नाहीत त्या सवयी सोडण्याचे व्रत धरावे. व्रत मोडावयाचे नाही, ही ओढ असते व म्हणून व्रत पाळले जाते आणि वाईट सवयी आपोआप सुटतात!

आपल्या पूर्वजांनी चातुर्मासात फार विचारपूर्वक बंधने घातली होती! ह्या ना त्या रीतीची बंधने लाविली तर ती हितकारकच ठरतात! कारण त्यामुळे मनाला व शरिराला शिस्त लागते व आत्मविश्वास निर्माण होतो.

**या आषाढ महिन्यात** नामदेव, जनाबाई व सावतामाळी या संतांच्या कथा तुम्ही वाचल्या. त्याचप्रमाणे लोकमान्य टिळक व आगरकर यांसारख्या थोर देशभक्त व समाजसुधारकांबद्दलही माहिती मिळविली. संतांच्या चरित्रापासून निगर्वी व सदाचरणी

तुम्ही व्हावे व टिळक-आगरकरांपासून देशसेवा व समाज-सुधारणेची स्फूर्ती तुम्ही घ्यावी. त्याचप्रमाणे चातुर्मास म्हणून तुम्हीही एखादे सत्कृत्य करण्याचे व्रत घेतल्याने मनाला शिस्त लागून आत्मविश्वास वाढेल. एवढे केले म्हणजे आषाढ मासाने तुम्हांस खूपच मार्गदर्शन केले असे होईल.

## स्वाध्याय

(१) एकादशी देवतेला अवतार का घ्यावा लागला ?

(२) विठोबा खेचरापासून नामदेव प्रथम कोणता धडा शिकले ?

(३) जनाबाईवर चोरीचा आळ का आला ?

(४) लो. टिळकांनी जनतेस कसे जागृत केले ?

(५) थोडक्यात माहिती द्या—(अ) आगरकर, (ब) सावतामाळी, (क) नामदेव.

9570 15/1/72
BVBK-0401540